# वर्ग -3 व 4 कर्मचा-यांची विभागीय चौकशी

महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम 1964 हे नियम जिल्हा परिषदेचे जे कर्मचारी असतील त्या सर्व कर्मचा-यांना लागू होतील.

**(अ) पदावरुन तात्पुरते दुर करणे (निलंबन) :-**

परिषदेच्या कर्मचा-याविरुध्द शिस्त विषयक कार्यवाही पुर्ण झालेली असेल किंवा अनिर्णीत असेल त्याबाबतीत किंवा कोणत्याही फौजदारी प्रकरणांचा बारीक तपास किंवा न्याय चौकशी करणेत येत असेल त्याबाबतीत नियुक्ती प्राधिकरण परिषदेच्या कर्मचा-यास पदावरुन निलंबित करु शकेल. परिषदेच्या ज्या कर्मचा-यास फौजदारी स्वरुपाच्या आरोपाखाली किंवा अन्य कारणांसाठी 48 तासापेक्षा अधिक मुदतीकरता अभिरक्षेत स्थानबध्द करणेत आलेले असेल अशा कर्मचा-यास स्थान बध्दतेच्या दिनांकापासुन प्राधिकरणाच्या आदेशाव्दारे पदावरुन तात्पुरते दूर करण्यात आले असलेचे समजण्यात येईल व पुढील आदेश मिळेपर्यंत त्यास पदावरुन दुर करण्यात येईल.

निलंबित जि.प. कर्मचारी यांना देण्यात येणा-या निर्वाह भत्याचे तीन महिन्यानंतर पुर्नविलोकन करणे आवश्यक आहे.

**ब) जिल्हा परिषद कर्मचा-याविरुध्द चौकशी प्रस्तावति केल्यापासून 6 महिन्याच्या आत चौकशी पुर्ण होणे आवश्यक आहे.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 चा नियम 4 प्रमाणे परिषद कर्मचा-यास खालील प्रमाणे शिक्षा देता येईल.

1) ठपका ठेवणे

2) वेतनवाढी किंवा पदोन्नती थोपवून धरणे

3) जिल्हा परिषदेस पोहोचलेल्या आर्थिक नुकसानीची सर्व रक्कम किंवा तिचा भाग वेतनातुन वसुल करणे

4) निम्न सेवेत श्रेणीत किंवा पदावर आणणे

5) सक्तीची सेवा निवृत्ती

6) सेवेतुन काढून टाकणे

7) सेवेतुन बडतर्फ करणे

8) शिक्षा क्र 4 ते 7 मधील आदेश चौकशी केल्याशिवाय काढता येणार नाही.